# ग्रामीण विकास व भारतीय लोकशाही समोरील आव्हाने

**डॉ.भीमाशंकर मधुसूदन डहाळके,** सहाय्यक प्राधापक राज्यशास्त्र विभागप्रमुख, राजे रामराव महाविद्यालय जत, ता.जत जि. सांगली. **Email:** bmdahalke@gmail.com

---

पंचायतराज व्यवस्थेचा संबंध ग्रामीण विकासाशी आहे असे आपल्याला दिसून येते. स्वातंत्र्याच्या 75 वर्षांत आपण असताना आपल्याला एक बाब लक्षात घ्यावी लागेल की भारतीय ग्रामीण विकास खऱ्या अर्थाने 73 व्या घटनादुरुस्तीने मोठ्या प्रमाणात झाला आहे.1993 च्या नंतर भारतामध्ये पंचायतराज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा मिळाल्यानंतर ग्रामीण भागातील एक मध्यमवर्ग हा विकासाच्या प्रक्रियेमध्ये यायला सुरुवात झाली. मध्यमवर्गीय नागरिकांच्या हातामध्ये ग्रामीण भागात सत्ता मिळायला सुरुवात झाली व खऱ्या अर्थाने केंद्र व राज्य यांच्याकडून मिळणाऱ्या सोयी सवलती याविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती या माध्यमातून झाली. खेडोपाडी रस्ते, पाणी, दिवाबत्ती, घरकुल योजना सिमेंट रस्ते, गटार योजना, महिला सबलीकरण तसेच महिलांच्या सबलीकरणासाठीचे शासनस्तरावरून होणारे प्रयत्न जनतेपर्यंत मोठ्या प्रमाणात जाऊ लागले. त्यामुळे प्रत्येक नागरिक मोठ्या प्रमाणात राजकारणामध्ये सहभागी होऊ लागला आहे व जास्तीत जास्त सवलती आपल्या पदरात कशा पाडून घेता येतील यासाठी प्रयत्न करू लागला आहे असे आपल्या ग्रामीण भागाचे चित्र आज दिसत आहे हे जरी खरे असले तरी आजही ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात समस्या आहेत हे नाकारता येणार नाही.

**विषयाचे महत्व:-** माहिती तंत्रज्ञान मोबाईल फोन यांच्या माध्यमातून शासकीय व किंवा बिगर शासकीय योजनांची माहिती सर्वसामान्यांच्या पर्यंत ताबडतोब जाऊ लागली आहे. ही चांगली बाजू असली तरी त्याची दुसरी बाजू ही आपल्याला विचारात घ्यावे लागेल जसे की पक्षीय राजकारण, धार्मिक, जातीय राजकारण या बाबी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात दिसून येऊ लागले आहेत याचा परिणाम गावा गावांमधील राहणाऱ्या कुटुंबावर मोठ्या प्रमाणात झाला आहे. 73 व्या घटनादुरुस्तीने पंचायतीराज याचे स्वरूप बदलून गेलेले आहे सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन सत्ता समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचलेली आहे. राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास वर्ग तसेच महिला यांना राज्यकारभारा मध्ये सहभागी करून घेतले जात आहे. 73 व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायत राज्याला घटनात्मक दर्जा व प्रतिष्ठा मिळालेली आहे. वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीवरून पंचायत राज्य संस्थांची खरीखुरी आर्थिक स्थिती समजून येते त्यामुळे वेळेस त्यावर उपाय योजना करणे शक्य होते दुसऱ्या बाजूला भारतीय लोकशाही च्या 75 वर्षाच्या कालखंडामध्ये ग्रामीण विकास व आव्हाने या बाबींचा देखील आपल्याला विचार करावा लागेल. विशेषतः ग्रामीण भागामध्ये गरिबी दारिद्र्य मोठ्या प्रमाणात आजही दिसून येते त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात बेकारी ही सुद्धा दिसून येते. मागासलेपणा अशिक्षितपना यामळे बरीच लोक राजकारणामध्ये सहभागी होत नाहीत. दुसऱ्या बाजूला लोकसंख्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे त्यामुळे लोकांच्या समोरील समस्या वाढलेल्या आहेत. स्त्रियांच्या वरील अन्याय आजही कमी झालेला नाही. त्यांच्या बरोबरीने समाजामध्ये अजून काही समकालीन समस्या दिसून येतात या सर्व गोष्टींचा विचार भारतीय स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षानंतर सुद्धा आपल्याला आज करावा लागतो ही बाब अधिक महत्त्वाची आहे.

आपली लोकशाही ची वाटचाल पाहिली तर निवडणुकांमधील भ्रष्टाचार, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, कायद्याचे राज्य त्याला फसला जाणारा हरताळ या बाबी राजकीय व्यवस्थेच्या

स्थायीभाव झाल्या आहेत. सर्वच क्षेत्रांमध्ये अनाचार बोकाळला आहे गुन्हेगारीकरण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे लोक राजकारणापासून दूर जात आहे. त्याचा परिणाम हा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बघायला मिळतो हे आपल्याला आवर्जून लक्षात घ्यावी लागेल. एका पाश्चात्त्य अभ्यासकाने म्हटल्याप्रमाणे बुद्धी ज्ञान आणि चारित्र्य या तीन गुणांच्या आधारावर लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते याबाबतीत काही अपवाद वगळता आपल्याला राज्यकर्ता वर्ग कसा आहे हे लक्षात घ्यावे लागेल उमेदवारांनी मतदारांना भांडवलदारांनी जिंकलेल्या उमेदवारांना विकत घेण्याचा पायंडा रूढ झाल्यामुळे बुद्धी ज्ञान आणि चरित्रे या त्रिसूत्रीवर लोकशाहीचे अस्तित्व भवितव्य अवलंबून असते हा विचार आज मागे पडला आणि आज निवडणुकांमध्ये आपल्या मतदारांचा वर्तन बुद्धी वादापेक्षा भावनेवर आधारित दिसून येते. हे चित्र लोकशाही साठी नक्कीच चांगले नाही. प्रसिद्ध साम्यवादी विचारवंत मानवेंद्रनाथ रॉय यांनी असे म्हटले आहे कि या देशातील राजकीय पक्ष मतदारांच्या सदसद्विवेकबुद्धीला कधीच आवाहन करत नाहीत तर ते त्यांच्या भावनेला साद घालतात त्याचा परिणाम असा होतो की बुद्धिमान अज्ञानी व चारित्र्यसंपन्न राजकारणातून हद्दपार होतात आणि ही व्यवस्था मोठी भर धनदांडग्यांची मक्तेदारी बनते जी एक प्रकारची निर्वाचित हुकूमशाही असते हा एक मोठा दुर्गुण भारतीय लोकशाहीमध्ये आपल्याला जाणवतो.हीच बाब पंचायतराज व्यवस्थेला अधिक धोकादायक ठरते आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट** १.भारतीय लोकशाही सद्यस्थिती अभ्यासणे

२.भारतीय लोकशाही समोरील आव्हाने यांचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती** प्रस्तुत शोधनिबंधात साठी संशोधकाने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे सामाजिक शास्त्रांमध्ये कोणत्याही विषयावर संशोधन करीत असताना केवळ एकाच पद्धतीचा अवलंब करणे अशक्य असते यास सदरील विषय अपवाद नाही. संशोधन पेपर साठी प्राथमिक व दितीय साधनांचा वापर केला गेला आहे प्राथमिक साधनांमध्ये लोकशाही निर्मितीचा इतिहास विविध देशाच्या प्राचीन शिक्षण संस्थांची संकलित केलेली माहिती व द्वितीय साधनांमध्ये शासन संस्था व त्यांच्या कारभारावर आधारित विविध नियमावली यासाठी उपलब्ध असणारे ग्रंथ मासिक साप्ताहिक नियतकालिक इत्यादींचा समावेश केला गेला आहे.

संसदीय लोकशाहीच्या चौकटीमध्ये राहून एका अविकसित आणि प्रचंड लोकसंख्येच्या गरीब देशाचे दारिद्र्य दूर करण्याचा 1947 मध्ये केलेला प्रयत्न हा अपयशी होताना दिसतो आहे. जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा आज भारतात दारिद्र्यात जगणारा सगळ्यात मोठा समाज आहे त्या उघड सत्याने राज्यकर्त्यांची झोप उडाली आहे असे मात्र दिसत नाही. विकास करण्यासाठी एवढा वेळ मिळालेला असतानाही इतका मोठा समाज दारिद्र्यात खितपत पडणे हे निश्चित भारतीय लोकशाहीच्या 75 वर्षानंतर हितावह नाही. दारिद्र्य रेषेच्या व्यक्तीवर या देशांमध्ये शेकडो चर्चा झाल्या सत्तेत येणाऱ्या प्रत्येक केंद्र सरकारने आम्ही लाखो लोकांना दारिद्र्यरेषेच्या बाहेर काढले असे दावे केले पण देशाची प्रगती प्रत्यक्षात मात्र झाली नाही मात्र या क्षेत्रात यश मिळेल असा दावा केला तो प्रत्येकाने केल्याचं समोर येतं.

भारतामध्ये सर्वत्र आढळणाऱ्या या समस्या आहे यामध्ये उत्पादन, पोषण, निवारा, शिक्षण, आरोग्य,स्वच्छ पर्यावरण अगदी मूलभूत मानवी हक्कांचा देखील या ठिकाणी अभाव आपल्याला दिसून येतो हे अत्यंत वाईट आहे असेच आपल्याला दिसते. भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. लोकशाही मूल्यांची जपणूक भारताने आजपर्यंत योग्यरीत्या जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. वर्तमानात निर्माण झालेल्या लोकशाही समोरील समस्या

केवळ भारतात पुढेच नाही तर जगात लोकशाही असलेल्या बहुतांश देशांमध्ये लोकशाही मूल्यांचा ऱ्हास होताना दिसून येतो. भारतीय लोकशाही पुढे अनेक आव्हाने असली तरी लोकशाही मूल्यांची जोपासना करणे प्रत्येक भारतीयांचे आद्य कर्तव्य आहे. भारतात जनता सार्वभौम आहे अंतिम सत्ता जनतेच्या हाती आहे निवडणुकीच्या माध्यमातून आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार नागरिकांना प्राप्त झालेला आहे. शासनाला प्रश्न विचारण्याचा अधिकार जनतेला मिळालेला आहे. आपले विचार प्रकट करण्यासाठी अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिलेले आहे. यासाठी सर्व स्तरावर लोकशाही मूल्यांची रुजवणूक होणे अत्यंत आवश्यक आहे पारदर्शक निवडणुका लोकशाहीसाठी आवश्यक आहेत. या निवडणुका भारतामध्ये जात, धर्म, भाषा, संप्रदाय या आधारावर होत असतील तर लोकशाही मूल्य कसे जपले जाऊ शकते प्रसारमाध्यमांची भूमिका वर्तमाना मध्ये अत्यंत महत्त्वाची आहे. बेरोजगारी, जातीयवाद,धर्मवाद, भाषिक संघर्ष, दहशतवाद, भ्रष्टाचार यासारख्या समस्या संपविल्याशिवाय लोकशाही मूल्यांची जोपासना करणे अशक्य आहे.

**राजकीय उदासीनता**:- पंचायत राज मुळे लोकांना राजकीय शिक्षणाचे धडे मिळतील व त्यातून लोकांची राजकीय सक्रियता वाढेल ही घटनादुरुस्तीमागची भावना होती. हि काही अंशी अपुरी राहिली आहे. राजकारण व राजकीय प्रक्रिया बाबत नागरिक उदासीन असल्याचे चित्र सार्वत्रिक निवडणुकीत आपल्याला मतदानाच्या टक्केवारीवर स्पष्ट होते. आजपर्यंतच्या लोकसभेच्या निवडणुकीचे मतदान हे 64 टक्के पेक्षा अधिक झालेले नाही. अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, इटली, फ्रान्स यासह युरोपातील बहुसंख्य देशांमध्ये मतदानाचे प्रमाण 80 ते 90 टक्के राहिलेले आहे. स्थानिक पातळीवरील निवडणुकांच्या मतदानाची टक्केवारी चांगली आहे हे नाकारता येत नाही परंतु लोकसभा व विधानसभांच्या आजपर्यंतच्या सार्वत्रिक निवडणुका लक्षात घेता नागरिक व्यापक प्रमाणात राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभागी होतात असे मानणे संयुक्तिक ठरणार नाही. भारतीय नागरिक राजकारण व राजकीय प्रक्रियेबाबत काहीसा उदासीन असल्याचे चित्र स्पष्ट होते. म्हणजे राजकीय प्रक्रियेतील ग्रामीण लोकसक्रिय सहभागी होत नाही. नागरिक स्वतःला राजकीय प्रक्रियेत प्रति उत्तरदायी मानत नाही. व्यक्ती स्वतःला राजकीय प्रक्रियेतून निर्णयावर प्रभाव पाडण्यास असमर्थ मानतो. थोडक्यात राजकीय प्रक्रिया राजकारण निवडणुका याबाबत नावड म्हणजेच राजकीय उदासीनता हा लोकशाही शासनपद्धती असलेल्या देशांमध्ये लोकांच्यामध्ये राजकीय प्रक्रियेबाबत ही उदासीनता दिसून येते त्यास राजकारणाचे होत असलेले गुन्हेगारीकरण व गुन्हेगारांचे राजकारण ही बाब जबाबदार आहे. जनता आणि सर्वसाधारण मतदार राजकारणाच्या वाढत्या गुन्हेगारीकरणामुळे चिंतातुर झाला आहे. त्याच्याच जोडीला वाढता राजकीय भ्रष्टाचार येथूनच राजकीय उदासीनतेचे प्रमुख कारण बनले आहे.

**दारिद्र्य:-** दारिद्र्य एक विश्वव्यापी सामाजिक समस्या आहे विकसित राष्ट्रांबरोबरच विकसनशील राष्ट्रांमध्येही या समस्येने अनेक सामाजिक प्रश्न निर्माण केलेले आहेत. विकसनशील राष्ट्रांमध्ये तर या समस्येची उग्र स्वरूप दिसून येते भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांमध्ये पुर्वापार चालत आलेल्या विषमतेमुळे दारिद्र्याची व्याप्ती व स्वरूप सतत बदलत गेल्याचे दिसून येते. भारतीय समाजाच्या संदर्भात दारिद्र्य व दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण याचा आपण जर विचार केला तर नक्कीच या दारिद्र्यरेषेचा भारतातील आर्थिक, राजकीय, सामाजिक,सांस्कृतिक व शैक्षणिक अशा मानवनिर्मित घटकावर त्याचा परिणाम दिसून येतो. याशिवाय भारतातील धर्म, जात, भाषा, प्रांत, लिंग वगैरे या कारणामुळे ही दारिद्र्याला नेहमीच प्रभावित झालेले दिसून येते आणि ह्याच दारिद्र्याचा परिणाम मुख्यत्वे ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानावर त्यांच्या राजकीय

वर्तनावर राजकीय सहभागावर मोठ्या प्रमाणात दिसून येतो. समाजामधील दारिद्र्याचे वाढलेलं प्रमाण हे लोकशाहीसाठी नक्कीच घातक असते. भारतातील दारिद्र्याचे मुख्य कारण वाढती लोकसंख्या आहे वाढत्या लोकसंख्येमुळे भारताला आर्थिक विकास उंचावता आलेला नाही कारण भांडवल निर्मितीसाठी चा निधी लोकसंख्येवर खर्च होत असल्यामुळे त्याचा परिणाम आपल्याला दिसून येतो जीवनावश्यक वस्तूंच्या सतत वाढणाऱ्या किमती देखील या समस्यांना कारणीभूत ठरतात.

दारिद्र्याची खरी कारणे अनेक विचारवंतांच्या मते दारिद्र्याची कारण हे वैयक्तिक आहे. परंपरावादी दृष्टिकोनातून जातीयता, बलुतेदारी, मूल्यव्यवस्था, वशिला, लाचलुचपत, अंधश्रद्धा इत्यादी कारणे दारिद्र्याला जबाबदार आहे. भारतीय समाजातील लोक दारिद्र्यात समाधान मानत असतात. भारतातील वाढती लोकसंख्या हेसुद्धा दारिद्र्य साठी कारणीभूत आहे भारतातील कोट्यवधी लोकांना बेकरीच्या समस्यांना सामोरे जावे लागते. भारतातील विषमतेमुळे श्रीमंत श्रीमंत होत जातो. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी आहे त्यामुळे भारतातील दारिद्र्य वाढले आहे यासाठी ग्रामीण भागामध्ये शासनस्तरावरून दारिद्र्य निर्मूलन अशा पद्धतीच्या योजना राबवल्या गेल्या तरीसुद्धा दारिद्र्य आपल्याला कमी होताना दिसत नाही. पर्यायाने दरिद्री लोक हे राजकारणामध्ये आपली भूमिका योग्य पद्धतीने बजावू शकत नाही म्हणून भारताच्या विकासामध्ये एक आव्हान म्हणून दारिद्र्य आपल्याला समोर येताना दिसून येते.

**जातीचा प्रश्न**:- भारतीय स्वातंत्र्याच्या 75 वर्षाच्या कालखंडामध्ये भारतासमोर आजही एक परंपरागत प्रश्न वर्षानुवर्ष आहे तसाच आहे त्यामध्ये जातीचा प्रश्न आहे वंशवादाचा प्रश्न आहे धार्मिक वादाचा प्रश्न आहे. समाजातील स्त्रियांचे हक्क संबंधित प्रश्न जसे च्या तसे उभे आहे. जगाची अर्थव्यवस्था जेवढी प्रगत होत आहे तितक्याच मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार यासारखे प्रश्न अधिक गंभीर होत चालली आहे. राजकीय परिस्थिती, शिक्षण यासारख्या गोष्टी सुद्धा कारणीभूत ठरतात व्यवस्थित जर एखाद्या व्यक्तीला शिक्षण मिळाले नाही तर त्याच्या अंगी असते त्या गुणांचा विकास न झाल्यामुळे त्याला रोजगार मिळत नाही रोजगाराअभावी त्याच्या दैनंदिन गरजा पूर्ण होत नाही या चक्रातून ती व्यक्ती आणि तो देश बाहेर येऊ शकत नाही एखाद्या देशाची भौगोलिक परिस्थिती रोजगारासाठी मुबलक साधन संपत्तीचा अभाव असल्यास त्या देशाला दुसऱ्या देशांवर अवलंबून राहावे लागते व यातूनच पुरेसा रोजगार देखील मिळू शकत नाही म्हणून दारिद्र हे अजूनच

**भ्रष्टाचार**:- भ्रष्टाचाराची समस्या ही काही भारतासाठी नवीन नाही परंतु आजच्या इतकी भ्रष्टाचाराच्या समस्येच्या गाजावाजा कधी झालेला नव्हता. कौटिल्याने सुद्धा आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात शासन व्यवस्थेच्या सुधारणांमध्ये भ्रष्टाचार अडथळा निर्माण करतो हे मान्य केले आहे. भ्रष्टाचाराच्या निर्मूलनासाठी मोठ्या प्रमाणात उपाययोजना सुचवल्या गेल्या परंतु कधी इच्छाशक्तीचा अभाव तर कधी स्वार्थी राजकारणाचा स्वार्थी हेतू आहे. मागील काही वर्षांमध्ये भ्रष्टाचारावरून चर्चेला उधाण आलेले असताना भ्रष्टाचाराच्या कर्माचा जेव्हा आपण शोध घेतो तेव्हा च्या पाठीमागे वैयक्तिक स्वार्थ, पैशाची लालसा हे एक महत्त्वाचे कारण आहे असेच म्हणावे लागते आणि म्हणूनच भ्रष्टाचाराची समस्या ही जागतिक स्वरूपाची बनलेली आहे आणि त्यामुळे जगाच्या समोर भ्रष्टाचार ही समस्या आहे.

**महिलांची स्थिती**:- राजकारणात स्वातंत्र्याच्या 75 वर्षांनंतर महिलांना पाहिजे त्या प्रमाणात आजही वरच्या राजकारणात स्थान मिळू शकले नाही. ग्रामीण भागात महिलांचा राजकारणात सहभाग

वाढत आहे मात्र महिलांचा राजकारणामध्ये भारतीय लोकसंख्या ज्या प्रमाणात आहे त्या प्रमाणात सहभाग मिळालेला नाही. पंचायतराज व्यवस्थेतील मुळे पन्नास टक्के आरक्षण मिळाले ते यशस्वी झाले मात्र पुरुषी प्रभावामुळे महिलांना संसद विधिमंडळात मात्र आरक्षण मिळत नाही. योग्य प्रमाणात महिलांचा विधिमंडलामध्ये सहभाग होत नाही तोपर्यंत भारतीय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही हे भारतीय लोकशाही समोरील आव्हाने म्हणावे लागेल आज केवळ 11.8 टक्के एवढेच प्रमाण राजकारणात महिलांचे दिसते. जागतिक स्तरावर भारत 150 व्या क्रमांकावर आहे. पाकिस्तान 101 या क्रमांकावर आहे 2019 च्या आकडेवारीनुसार नेपाळ 32.8% बांगलादेश 20.6 % पाकिस्तान वीस पॉईंट दोन टक्के भूतान 14.9% तर भारत 12.1 % पाकिस्तानमध्ये महिलांचा राजकारणामध्ये सहभागी असल्याचे प्रमाण आहे.

**जातीयता**:- जातीयता भारतीय लोकशाही पुढील सर्वात मोठी समस्या आहे. आज संपूर्ण भारतीय राजकारणात जातीयता मुख्यत्वे आपल्याला दिसून येते भारतामध्ये असं आज कोणतेही क्षेत्र राहिलेले नाही जिथे जातीयता पाळली जात नाही. जातीय आधारावर आरक्षण जातीय राजकारण, समाजकारण, अर्थकारण, राजकीय धोरण म्हणजेच सर्वच घटकांना प्रभावित करणारी व्यवस्था म्हणजे जात. त्यामुळेच भारत एकसंध होण्याला मोठा अडथळा आज दिसतो प्रत्येक घटक राज्यात विविध जाती आहेत यात श्रेष्ठ आणि कनिष्ठ असा वाद सुरू असतो श्रेष्ठत्वाची लढाईत इथे पहावयास मिळते. जातीयता एक मोठी समस्या झाली आहे. पंडित नेहरूंनी शिक्षणासोबत जात जाईल असे म्हटले होते पण ती जात गेलेली नाही. ज्या जातींची संख्या कधी तिथेच त्या जातींचे राजकीय वर्चस्व दिसून येते राजकारण तर याशिवाय शक्यच नाही या जातींची संख्या तिथे राजकीय वर्चस्व त्या जातींचे दिसते. पक्ष संघटना याकरता निर्माण झाले असून त्या कार्य करीत असतात म्हणून जातीयता संपवणे अधिक महत्त्वाचे आहे. आपण जर उदाहरणच घ्यायचं झालं तर उत्तर प्रदेश महाराष्ट्र अजून अशी बरीच राज्य आहेत त्या राज्यांमध्ये विशिष्ट जातींची सरकार सत्तेवर येतात आणि आपले सरकार स्थापन करून जातीच्या संदर्भात निर्णय घेताना दिसतात याचा परिणाम जात अधिक घट्ट होताना दिसते जातीपातीचे राजकारण यातून अधिक वाढते जात ही मात्र नष्ट होताना आपल्याला दिसून येत नाही.

**धर्म व प्रांतवात:-** धर्म व प्रांतवाद हेसुद्धा लोकशाही व्यवस्थेसमोर मोठे मोठे आव्हान आहे भारतात वेगवेगळ्या जाती-धर्माचे पंथाची लोक राहतात. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार धर्माचा स्वीकार करण्याचा आपल्या धर्माची पूजापाठ करण्याचा अधिकार आहे असे असताना सुद्धा हाच धर्म धर्मामध्ये विद्वेषाचे वातावरण निर्माण आहे. धर्मावर आधारित राजकीय पक्षांची निर्मिती झालेली आहे आणि हेच राजकीय पक्ष धर्म वादाला खतपाणी घालताना दिसताहेत ही परिस्थिती लोकशाहीसाठी अत्यंत मारक ठरत आहे. धर्माप्रमाणे प्रांतवाद सुद्धा लोकशाहीला घातक ठरत आहे मी गुजराती आहे कर्नाटकामधील आहे त्या भावना लोकशाहीला घातक ठरत आहे. मी भारतीय नागरिक आहे ही भावना नागरिकांमध्ये निर्माण व्हायला हवी तेव्हाच खऱ्या अर्थाने लोकशाही यशस्वी होण्यास हातभार लागेल. आज भारतामध्ये भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे ही एका बाजूला जी राजकीय पक्ष सांगत आहेत तोच राजकीय पक्ष दुसऱ्या बाजूला एक विशिष्ट धर्म संकटात आहे आणि म्हणून या धर्माच्या साठी प्रयत्न करणार हे उघड पणाने सांगत आहे व त्याला अनुसरून राजकारण करत आहेत. धर्माचा उपयोग राजकारणामध्ये सरळ-सरळ उघडपणे करणे ही खरंतर धर्मनिरपेक्षता या तत्वाला हरताळ फासणेच आहे. त्यामुळे धर्माच्या आधारावर लोक निवडणुका लढवतात लोकांसमोर जाऊन मते लागतात

आणि मग धर्म जात डोळ्यासमोर ठेवून नागरिक सुद्धा मतदान करतो त्यामुळे नक्कीच ह्या बाबी भारतासारख्या धर्मनिरपेक्ष लोकशाही असलेल्या देशांमध्ये अलीकडे उघड-उघड आणि मोठ्या प्रमाणात होत आहे हे भारतीय लोकशाही समोर अत्यंत घातक आहे असे म्हणावे लागते.

**मतदारांची उदासीनता**:- लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये मतदारांची भूमिका हीच खऱ्या अर्थाने अतिशय महत्त्वाची असते मतदान करणाऱ्यांनी जर मतदान करण्याच्या बाबतीत उदासीनता दाखवली तर मग मतदानाबद्दल जागरुकता निर्माण करावी लागेल आणि मग त्यासाठी अजून एका नवीन प्रश्नाची निर्मिती होईल आपल्या देशामध्ये लोकसभेपासून ग्रामपंचायती पर्यंत कुठलीही निवडणूक असूद्या मतदानाची टक्केवारी पाहिजे तेवढ्या प्रमाणात दिसून येत नाही. यासाठी मतदारांनी मतदानाच्या दिवशी आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे.

भारतीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी काही उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये देशातील लोक किती प्रमाणात शिक्षित आहेत यावर लोकशाहीचे यश अवलंबून असते. देशामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढायला हवे त्याकरिता शासनाने शिक्षणातही वेगवेगळ्या प्रकारच्या सुविधा देणे अत्यंत आवश्यक आहे. समाजामधील असमानता दूर करणे समाज जीवनातील विविधता नष्ट होण्याचा त्यामुळे धोका कमी होतो समाजामधील सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. त्यावर पर्याय शोधून विकेंद्रीकरण करणे आणि स्थानिक स्तरापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत नेतृत्व निर्माण करण्याची एक साखळी निर्माण करणे आवश्यक आहे. लोकशाही यशस्वी करायची असेल तर जनतेचा लोकशाहीवर विश्वास असणं आवश्यक असते जर जनतेचा लोकशाही मार्गावर विश्वास नसेल तर ते बेकायदा मार्गाकडे वळतील त्यामुळे अल्पकाळातच लोकशाहीचा नष्ट होण्याची शक्यता असते कितीही समस्या आल्या तरी लोकांचा लोकशाहीवरील विश्वास कमी होता कामा नये आपल्या मागण्या मंजूर करून घेण्यासाठी लोकांनी लोकशाहीच्या मार्गाने अवलंब केला पाहिजे तरच लोकशाही टिकू शकेल.

संदर्भ:-

1. डॉ. सुहास पळशीकर,राज्यशास्त्र कोश डॉ. पुरा दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे
2. डॉ. दिलीप सिंग निकुंभ,आधुनिक राजकीय विचारप्रणाली, प्रशांत पब्लिकेशन जळगाव जानेवारी 2015.
3. पळशीकर सुहास , राजकारणाचा ताळेबंद भारतीय लोकशाहीची वाटचाल, साधना प्रकाशन पुणे 2017.
4. पळशीकर सुहास, भारतातील प्रादेशिक पक्षांचे राजकारण, साधना प्रकाशन पुणे 2009.
5. प्रा.लोटे रा. राज्य शास्त्रीय सिद्धांत, पिंपळापुरे प्रकाशन नागपूर.
6. पाटील विलास महाराष्ट्र शासन व राजकारण, फडके प्रकाशन कोल्हापूर.
7. डॉ. वैद्य सुमन डॉ. कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपूर
8. डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन पुणे 2014.
9. डॉ..कुरकुटे डॉ..खरात डॉ..देशमुख-भारतीय लोकशाहीची वाटचाल, अथर्व पब्लिकेशन 2021.